लोकमत
हॅलो नवी मुंबई
मुंबई, सोमवार, दि. २२ सप्टेंबर २०१४

## महिला सुरक्षेसाठी खारघरवासीयांची दौड

संदेश रेणोसे




नवी मुंबई : सरस्वती एज्युकेशन सोसायटी आयोजित एसईएस मॅरेथॉन २०१४ रविवारी उत्साहात पार पडली. यात दोन हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महिलांची सुरक्षा, विद्यार्थ्यांचा निरोगीपणा, व्यसनाधीनता यावर जनजागृती करण्याचा मुख्य उद्देश मॅरेथॉनचा होता. तीन गटात झालेल्या या स्पर्धेत ५ कि. मी. महिला गटात नीलम राजपूत, ५ कि.मी. पुरुष गटात शैलेश राव, १० कि.मी. पुरुष गटात सुनील प्रसाद यांनी प्रथम क्रमांक पटकाविले. आंतरराष्ट्रीय दर्जाचे दोन धावपटू इस्साक क्लिप्रेमोय व डेविड क्लिप्रिच हे देखील या मॅरेथॉनमध्ये सहभागी झाले होते. खारघरमधील सेंट्रल पार्क रोड, उत्सव चौकमार्गे ही मॅरेथॉन सुरु झाली. ५ कि. मी. महिला गटात द्वितीय सुप्रिया पाटील व तृतीय प्रेरणा भोपी तसेच ५ कि. मी. पुरुष गटात द्वितीय अखिल कोरु व तृतीय राकेश कुमार, १० कि.मी. पुरुष गटात द्वितीय ज्ञानेश्वर व तृतीय शशी कुमार असे अनुक्रमे क्रमांक मिळविले. यावेळी माजी आमदार प्रशांत ठाकूर , सरस्वती अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सचिव वृषाली देशमुख, प्राचार्य डॉ. मंजुषा देशमुख, रावेर इन्स्टिट्यूटचे प्राचार्य व्ही. एस. निंबाळकर, राम भिसे, मंदिप कौर, एस. लाटकर आदी उपस्थित होते.

By Ram Bhise

ALL DIMENSIONS ARE IN MM

Saraswati Education Society's